PUNE RESEARCH TIMES ISSN 2456-0960
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES VOL 5, ISSUE 1

# मराठ्यांची पोलीस व्यवस्था

**प्रा. डॉ. शामराव घाडगे**
उप-प्राचार्य व इतिहास विभागप्रमुख,
विद्या प्रतिष्ठानचे
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,
विद्यानगरी, बारामती, जिल्हा-पुणे.
**(महाराष्ट्र) भारत**

**सारांश:-**

पोलीस हा शब्द शहर किंवा नगरराज्य आणि राज्याची परिस्थिती व राज्यघटना या अर्थाच्या ग्रीक (ग्रीक शब्दावरुन Polis हे त्याचे रोमन लिप्यंतर) शब्दापासून निघालेला असून तो मुलकी राज्यव्यवस्था या अर्थाने प्रथम फ्रेंच भाषेमध्ये रुढ झाला। सर्व पाश्चिमात्य राष्ट्रांत प्राचीन काळापासून नगरपालिका आणि तत्समान इतर स्थानिक स्वराज्य संस्थाच कायदा व सुव्यवस्था राखण्याचे काम करीत असल्यामुळे कालांतराने 'पोलीस' या शब्दाला आधुनिक अर्थ प्राप्त झाला। पोलीस हे शासनाने तयार केलेल्या कायद्यांची अंमलबजावणी करतात। लोकांच्या जीवित वित्ताचे रक्षण करणे, गुन्ह्यांना आळा घालणे, घडलेल्या गुन्ह्यांचा शोध घेऊन आरोपीला पुराव्यानिशी न्यायासनासमोर हजर करणे, समाजात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करणे इत्यादी कामांचा समावेश पोलिसांच्या कर्तव्यांत होतो। पोलीस म्हणजे जनकल्याणासाठी कार्य करणारी समाजातील एक शक्ती असून त्याद्वारे संपत्ती आणि स्वातंत्र्यावर नियंत्रण ठेवले जाते। पोलीस संकल्पनेत केवळ शासनाचे संरक्षण आणि समाजातील शांतता आणि सुव्यवस्था इतकेच अपेक्षित नाही तर लोकांच्या जीविताचे आणि वित्ताचे देखील संरक्षण केले जावे, हे देखील त्यांचे मुख्य कार्य आहे।१

**पोलीस -**

ऑक्सफर्ड शब्दकोषाप्रमाणे पोलीस म्हणजे, "अशी एक कार्य पद्धती की जिच्याद्वारे कायद्याचे संरक्षण आणि कायद्याची अंमलबजावणी करण्याचे कार्य केले जाते।" इ।स।१९२९ च्या रॉयल कमिशनने

पोलिसांच्या अधिकारांच्या बाबतीत असे म्हटले आहे की, 'पोलीस म्हणजे अशी एक व्यक्ती की जी कर्तव्य म्हणून कार्य करते परंतु जे कार्य वास्तविक स्वतःच्या मनानेच त्या व्यक्तीने एरव्ही माणूस म्हणून केले असते।'

**कायदा**

राज्य या संस्थेचे महत्वाचे कार्य म्हणजे समाजाचे कल्याण, म्हणजेच जन-कल्याण होय। समाजाचे कल्याण साधण्यासाठी, शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी, राज्य अथवा समाजासाठी काही नियम वा कायदे तयार करणे, ते लागू करणे तसेच त्यांचे समाजाकडून पालन करुन घेणे, हे महत्त्वाचे असते। समाजात जर कायदे नसतील तर त्या समाजात अराजकता माजेल यात काही शंका नाही। राज्य चालविण्यासाठी, राज्य करण्यासाठी कायदे तयार केले जातात। कायद्याचे पालन न केल्यास दंडाची व्यवस्था केलेली असते। म्हणजेच समाजात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी कायद्याची आवश्यकता असते। त्यामुळेच समाजातील प्रत्येक घटकाचे अधिकार सुरक्षित राहिले आहेत।

कायदा हे समस्यांचे समाधान करण्याचे एक शास्त्र आहे। हे शास्त्र नैतिक स्वरुपाचे असून न्याय या तत्वावर आधारलेले आहे। यामुळेच समाजव्यवस्थेसारख्या गुंतागुंतीच्या प्रक्रियेत देखील सामाजिक न्याय अस्तित्वात असतो असे लक्षात येते। अर्थात कायद्याची अंमलबजावणी ही एक प्रगत स्वरुपाची कला असून त्यासाठी कौशल्यपूर्णता अंगी असणे आवश्यक आहे।

कायदा म्हणजे विचारपूर्वक लिखित असे विधान असते, जे निश्चित व सरळसरळ रीतीने अंमलबजावणासाठी तयार केलेले असते, ज्यामुळे समाजात शांतता,समाधान आणि सामाजिक न्याय प्रस्थापित केला जातो।

**सुव्यवस्था**

वेबस्टर शब्दकोशाप्रमाणे सुव्यवस्था म्हणजे ज्याची अंमलबजावणी होऊ शकते अशा प्रकारचा नियम म्हणजे कायदा असतो व ज्याची अंमलबजावणी शक्य नाही किंवा होत नाही त्याला कायदा म्हणण्याचे काहीही कारण नाही। सुव्यस्था म्हणजे अशी प्रक्रिया असते की, ज्याद्वारे समाजातील विविध संस्थांमध्ये सुसंवाद प्रस्थापित करता येतो किंवा केला जातो आणि अनुभवता देखील येतो। अशा रीतीने कायदा व सुव्यवस्था यांना एकमेकापासून वेगळे करता येत नाही। अशा कोणत्याही कायद्याच्या अस्तित्वाची कल्पना होऊ शकत नाही की, ज्याद्वारे समाजात शिस्त प्रस्थापित होऊ शकत नाही आणि असा कोणताही कायदा समाजात नसतो की, ज्याचे बंधन समाजाला पाळावे लागत नाही। कायद्याची अंमलबजावणी साधनांद्वारे केली जात नसेल तर कोणत्याही सुव्यवस्थेची कल्पनाही समाजात करता येत नाही।

कायद्याची अंमलबजावणी केव्हाही निरर्थक असत नाही। कायद्याचे प्रशासन कायद्यासाठी नसते तर समाजात सुव्यवस्था प्रस्थापित करण्याचे ते एक साधन असते। त्यामुळे मुलभूत अर्थाने कायद्याची अंमलबजावणी समाजात शांतता, सुव्यवस्था जीवित व वित्त राखण्यासाठी असते, इतकेच नाही तर नागरिकांच्या मूलभूत हक्काचे संरक्षण करण्यासाठीचे ते एक साधन असते। समाज, प्रतिनिधी, कायदा व सुव्यवस्था यांना एकत्रित साधण्याचा दुवा म्हणजेच पोलीस व्यवस्था होय, त्यामुळे या व्यवस्थेला अनन्यसाधारण महत्त्व आहे। समाजात प्रतिनिधींद्वारे कायदा आणि सुव्यवस्था राखण्याचे कार्य केले जात असले तरी क्ाऽायदा व सुव्यवस्था राखण्याचे कार्य समाजात करणारी पोलीस व्यवस्था ही सर्वात महत्वाची मानली जाते। समाज, प्रतिनिधी, कायदा व सुव्यवस्था यांना एकत्रित साधण्यांचा दुवा म्हणजेच पोलीस व्यवस्था होय, त्यामुळे या व्यवस्थेला महत्त्व आहे।

**शिवपूर्वकालीन पोलीस व्यवस्था (इ।स।१३०० ते १६५०)**

शिवपूर्व काळात पोलिसांची कार्ये करण्यासाठी, शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी, गुन्हयांचा तपास करण्यासाठी स्वतंत्र पोलीस व्यवस्था अस्तित्वात असल्याचे आढळत नाही।२ स्थानिक मुलकी अधिकारी जहागिरदार, मोकासदार, हवालदार, ठाणेदार, देशमुख यांच्याकडेच आपल्या अधिपत्या खालील प्रदेशात पोलीस व्यवस्थेचे शांतता व सुव्यवस्था राखण्याचे कार्य होते। परगण्यात शांतता व सुरक्षा ठेवण्यासाठी नाईकांचे पथक असे। या पथकाच्या प्रमुखास 'सरगुन्हो' असे म्हणत।३ नाईकांचे पथक ज्यावेळी कसबा किंवा परगण्याचे गांव यांचे सरक्षण करत असे तेंव्हा त्या पथकाला 'चोरदस्ती पथक' असे म्हणत।४ तसेच खेडेगावामध्ये मोकादमास मदत करण्यासाठी रक्षक असे। नाईकवडी किंवा सरगुन्हो हे बऱ्याच प्रमाणात संख्येने मुस्लीम असत तर नाईक हे नेहमी रामोशी, भिल्ल किंवा मांग या जमातीतील असत।५ काही महत्त्वाच्या शहरात व राजधानीच्या ठिकाणी मुख्य पोलीस अधिकारी असे त्यास 'कोतवाल' असे म्हणत। मोठ्या शहरांमध्ये त्यांची नेमणुक केली जात असे। शहरातील नागरिकांचे व त्यांच्या मालमत्तेचे सरंक्षण करणे ही त्याची जबाबदारी असे। राजधानीत शांतता आणि सुव्यवस्था राखणे हे त्यांचे काम होते। त्यांच्या हाताखाली मोठ्या संख्येने नाईक नेमलेले असत।

**शिवकालीन पोलीस व्यवस्था (इ।स।१६५० ते इ।स।१७५०)**

महाराष्ट्रामध्ये शिवाजी महाराजांनी स्वराज्याची निर्मिती केल्यानंतर पोलीस व्यवस्थेचे कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांची नवीन साखळी दिसून येते। यामध्ये परगण्याचा मंत्री, सरसुभेदार, सुभेदार व मोकादम यांचा समावेश होत असे। नाईक, नाईकवडी व ग्रामरक्षक हयांच्या मदतीने स्थानिक पथके गावाचे संरक्षण करत असल्याची जूनी पद्धत तशीच सुरु होती।

राज्याचा कारभार उत्तमरीत्या करता यावा म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रशासन व्यवस्थेकरिता अष्टप्रधान मंडळाची स्थापना केली होती। प्रत्येक मंत्र्याला स्वतंत्र कामे नेमून देण्यात आली होती। अष्टप्रधानातीलच मंत्री (वाकनीस) हा राज्याचा गृहमंत्री असे। गुप्तहेर संघटन याच्या नियंत्रणाखाली

PUNE RESEARCH TIMES ISSN 2456-0960
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES VOL 5, ISSUE 1

असे। राज्यातील गुप्त बातम्या तसेच परराज्यातील महत्त्वाच्या बातम्या हेरांकरवी गोळा करुन त्या शुद्ध करुन त्यावर सावधगिरीच्या उपाययोजना कराव्या लागत असत। बातमीचे महत्त्व बघून, बातमी छत्रपती शिवाजी महाराजांपर्यंत पोहचवली जात असे। छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यकारभाराच्या सोयीसाठी स्वराज्याचे एकूण चौदा प्रांतामध्ये(सुभा) विभाजन केले होते। काही महाल मिळून सुभा तयार होत असे। काही मौजे किंवा खेडी मिळून महाल होत असे। त्यांनी प्रत्येक प्रांताच्या प्रशासन प्रमुखपदी एक सुभेदार व त्याच्या मदतीला कारकून नेमलेला असे। प्रजेच्या जीवित व वित्ताच्या रक्षणाची जबाबदारी सुभेदारावर असे। प्रांतातील पोलीस व्यवस्था म्हणजेच शांतता व सुरक्षा व्यवस्था आणि महसूल गोळा करण्याचे कार्य सुभेदाराकडे असे।

प्रांताची विभागणी महालात किंवा तालुक्यात केली होती। महालाचे नियंत्रण करणाऱ्या अधिकाऱ्यास 'हवालदार' म्हटले जात असे। काही गावांच्या गटात तालुक्याचे विभाजन केलेले होते। या प्रत्येक गटाच्या प्रमुखास 'कमाविसदार' असे म्हणत असत। शिवकाळात प्रत्येक मुलकी अधिकाऱ्याची स्वतंत्र कचेरी असे। प्रत्येक सुभेदाराच्या हाताखाली काम करण्यासाठी दिवाण, मुजुमदार, फडणीस, सबनीस, कारखानीस, चिटणीस, जमादार व पोतणीस असे आठ मदतनीस असत। या सर्वांच्या नेमणूका खुद्‌ग-छत्रपती शिवाजी महाराज करीत असत। प्रांतीय प्रशासनासाठी मुलकी अधिकारी असत। या मुलकी अधिकाऱ्यांवर शांतता व सुरक्षा प्रस्थापीत करण्याची पोलीस व्यवस्थेची जबाबदारी असे। छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ल्यांच्या पुनर्रचना केल्यानंतर किल्ला व त्याच्या आसपासच्या प्रदेशाच्या संरक्षणासाठी स्वतंत्र पथक ठेवत। किल्ल्याच्या प्रमुख अधिकाऱ्यास 'गडकरी' म्हणत असत। त्यांची प्रत्येक शिबंदी रामोशी आणि मांग जे पूर्वी किल्ल्यात रहात असत, त्यांची असे व त्यांना 'मेटकरी' असे म्हटले जात असे। 'मेटकरी' म्हणजे किल्ल्याजवळील मेटावर पहारा करणारे। डोंगराळ प्रदेशात प्रवाशांचे चोरांपासून रक्षण करण्यासाठी नेमलेल्या पोलीस व्यवस्थेचे कार्य करणाऱ्या सरकारी शिपायांना 'मेटेकरी' असे म्हणत असत।६

सुभेदार, हवालदार, कमाविसदार, मुकादम किंवा पाटील यांच्यावर त्यांच्या अधिपत्या खालील क्षेत्राची शांतता व सुव्यवस्था म्हणजेच पोलीस व्यवस्था ठेवण्याची जबाबदारी असे। शिबंदीची जबाबदारी हवालदाराकडे असे।७

**हवालदारः-**

किल्ल्याचा प्रमुख अधिकारी हवालदार असे। सामान्यापणे फक्त मराठा व्यक्तीचीच हवालदार म्हणून नियुक्ती केली जात असे। किल्याचे सर्व अधिकार त्यास असत। तो किल्ल्याच्या परिस्थितीचा आढावा घेऊन सायंकाळी किल्ल्याचे दरवाजे बंद करीत असे व सकाळी स्वतः उघडत असे। किल्यावरील गस्त घालणाऱ्यांची पाहणी करणे, पहारेकऱ्यांची तपासणी, चौकशी करणे, किल्ल्याची सुरक्षा व्यवस्था पहाणे इत्यादी पोलीस व्यवस्थेची कामे हवालदाराकडे असे। आज देखील पोलीस व्यवस्थेमध्ये 'हवालदार' पद उपयोगात आहे।

**सरनौबत**

सरनौबत हा परिभाषिक शब्द आहे। सरनौबत या शब्दाचा अर्थ निःस्पृह असा होतो। हे वरिष्ठ अधिकाराचे पद होते। गडावरील फिरतीवाल्यांची व लोकांची रात्री-अपरात्री केव्हांही चौकशी करण्याचे काम त्याच्याकडे असे। हे पोलीस व्यवस्थेचेच कार्य त्याच्याकडे होते।

महसुलाच्या संरक्षणाचे कार्य करणाऱ्या व्यक्तींना 'महाल शिबंदी' असे म्हणतात संरक्षणाचे कार्य बहुतांशी शिलेदार, हशम यांचेकडे असे। बऱ्याचवेळा त्यांच्या जोडीला सशस्त्र सैनिक दिले जात असत, त्यांना 'सनदी प्यादी' असे म्हटले जात होते। पोलीस व्यवस्थेचे शांतता व सुव्यवस्था राखणे हे प्रमुख कार्य होते। छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासन व्यवस्थेमध्ये कुठलेही पद वंशपरंपरागत नसे। प्रत्येक पदावर व्यक्तीची निवड ही त्या व्यक्तीच्या गुणांमुळे होत असे। त्यास रोख स्वरुपात पगार दिला जात असे। कुठलेही वतन अथवा जहागिरी दिली जात नसे।

**ग्राम पोलीस व्यवस्था**

राजाने ज्या लोकांना त्यांची कामे पार पाडण्यासाठी उत्पन्नाचा स्त्रोत म्हणून जमीन दिली, अशा लोकांना 'देशक' म्हणत। जमिनीच्या मोबदल्यात ते गावकीची विविध प्रकारची कामे करत असत। त्यांना गावाकडून काही हक्क प्राप्त झालेले असत। त्यांना गावात मानाचे स्थान असे। ते गावचे कायमचे अधिकारी होते। 'देशक' या गटात देशमुख किंवा देसाई, देशपांडे किंवा देशकुळकर्णी, पाटील, कुळकर्णी, चौगुला, शेटे, महाजन, महार, इत्यादीचां समावेश होता। त्यांचे अधिकार काही अपवाद वगळता वंशपरंपरागत होते। जोपर्यंत हे अधिकारी किंवा त्यांच्या पश्चात त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती प्रामाणिकपणे अणि प्रभावीपणे गावाची चाकरी करीत, तेथपर्यंत राजाने दिलेली जमीन त्या कुटुंबाचे वतन असे। या गटातील लोकांना 'वतनदार' असे म्हणत। हवालदार, मुजुमदार, कमाविसदार, कारकून इत्यादी सरकारी अधिकाऱ्यांना असे वंशपरंपरागत अधिकार नव्हते।

**चार सत्तांचे अधिराज्य**

सामान्यतः गावात चार प्रकारच्या सत्ता रुढ होत्या। यातील पहिली सत्ता दिवाणसत्ता म्हणून ओळखली जात असे। यात हवालदार,कारकून वगैरे राजाचे अधिकारी मंडळी असत आणि त्यांच्यामार्फत राजा आपली सत्ता राबवित असे। या सत्तेचे अधिकारक्षेत्र फारच मर्यादित होते। दुसरी सत्ता म्हणजे गोतसत्ता। गोतसभा किंवा आजच्या भाषेत ग्रामपंचायत ही गावातील सामाजिक दृष्ट्या महत्त्वाची अशी राजसत्तेहून वेगळी, पण समर्थ सत्ता होती। सभेत सर्व बलुतेदारांचे प्रतिनिधी असत। गावातील गोत सभेचा पाटील हा प्रमुख असे आणि महार हा गोतसभेचा पदसिद्ध सभासद होता। गोतसभेचा न्यायनिवाडा कोणाला न पटल्यास तो देशक, नंतर न्यायाधीश आणि त्यानंतर राजा यांच्याकडे दाद मागू शकत असे। तिसरी सत्ता ज्ञातिसत्ता किंवा धर्मसत्ता। ही सत्ता त्या जातीतील नागरिकांचे

नियमन करीत असे। जात पंचायतींना वेगळेच महत्त्व होते। राजालासुद्धा या सत्तेत ढवळाढवळ करण्याचा अधिकार नव्हता। चौथी सत्ता म्हणजे 'व्यापारी सत्ता' ही सत्ता बरीच मर्यादित होती।

गावगाड्याचे अधिकारी अणि राजसत्ता यांच्यामध्ये अधिकाऱ्यांची एक साखळी होती। अनेक गावांचा मिळून एक परगणा होत असे। देशमुख आणि देशपांडे हे परगण्याचे वतनदार अधिकारी होते। 'देशमुख' हा परगण्यातील सर्व पाटलांचा प्रमुख असे। त्यामुळे पाटील जे काम गाव पातळीवर करत असे, तेच काम देशमुख परगणा पातळीवर करीत असे। परगण्याच्या कायदा व सुवेवस्थेची जबाबदारी देशमुखाची होती। परगण्यातील रयतेच्या संरक्षणाची जबाबदारी देशमुखाची होती।

अनेक परगण्यांचा मिळून एक सुभा होत असे। सुभयाच्या प्रमुखाला 'सुभेदार' म्हणत असत। सुभयाच्या स्तरावार शांती व सुव्यवस्था राखण्याचे पोलीस व्यवस्थेच कार्य हे सुभेदारचे होते। काही सुभयांचा मिळून एक प्रांत होत असे आणि काही प्रांतांचे मिळून राज्य होत असे। प्रांताचा अधिकारी मंत्र्याच्या दर्जाचा असे। महाराजांच्या राज्यात तीन प्रांत होते। पहिल्या प्रांतात राज्याचा उत्तर विभाग म्हणजे कोकण आणि वरघाट म्हणजे लोहगड, जुन्नर, बारा मावळ आणि घाटावरचा प्रदेश यांचा समावेश होता। आठ सुभे असलेल्या प्रांताचे अधिकारी मोरोपंत पिंगळे मुख्य प्रधान होते। तेरा सुभे असलेल्या तळकोकण या दुसऱ्या प्रांताचे अधिकारी सुरनिस अण्णाजी दत्तो हे होते आणि पंधरा सुभे असलेल्या प्रांताचे अधिकारी दत्ताजीपंत वाकनीस होते। ८

**महार**

खेडेगावच्या रखवालीचे महत्त्वाचे कार्य यांच्याकडे असे। तसेच त्यास महत्त्वाच्या कामात पुढाकार घ्यावा लागत असे। त्यास पाटलाला पोलीस व्यवस्थेच्या कार्यात मदत करावी लागत असे। तो गावात आलेल्या व गेलेल्या व्यक्तींवर लक्ष ठेवत असे तसेच त्यास संशयीतांची माहिती पाटलास द्यावी लागत असे।

**हेरखाते**

सामान्यपणे असे म्हटले जाते की सक्षम गुप्तहेर यंत्रणा हा राज्यकारभाराचा कणाच असतो। राज्यातील तसेच शत्रुसैन्यातील बातम्या काढण्यासाठी, शत्रूंच्या हालचाली कशा असतील, त्यांचे पुढील धोरण काय असेल, त्यांना रसद कोठून मिळत आहे आणि शत्रूंचे हितचिंतक आपल्या राज्यात आहेत काय, हे पहाण्यासाठी शिवाजी महाराजांनी गुप्तहेर यंत्रणा फारच सक्षम ठेवली होती। गुप्तहेर विभागाचा प्रमुख बहिर्जी जाधव हा होता। त्यास बहिर्जी नाईक असे संबोधले जात होते। शिवाजी महाराजांना सुरत मोहीमेपूर्वी सुरत शहराची संपूर्ण माहिती,शहराची सुरक्षा व्यवस्था, शहरातील व्यापाऱ्यांची माहिती व त्यांची अर्थिक स्थिती इत्यादी बाबतची सर्व माहिती बहिर्जीने महाराजांना दिली होती। तसेच लालमहाल येथील शाहिस्तेखानावरील हल्ल्याप्रसंगी देखील बहिर्जी नाईक व त्यांच्या हेरांनी

लालमहालाची सर्व माहिती, सैन्याबद्ग-लची माहिती, शाहिस्तेखानाच्या खोलीबद्ग-लची माहिती, अगदी बारीक-सारीक गोष्टींच्या तपशिलासह सर्व माहिती बहिर्जीने महाराजांना पुरविली होती। तसेच गुप्तहेरांची मदत महाराजांना आग्रा सुटकेप्रसंगी देखील झालेली होती। गुप्तहेरांमुळे महाराजांना मोहिमा आखणे सोईचे जात होते। गुप्तहेर यांना त्यांच्या कामगिरीब-ल महाराज मुबलक प्रमाणात द्रव्य देत असत। हेरगिरी करणे हे पोलीस व्यवस्थेचे महत्त्वाचे कार्य असते। शिवाजी महाराजांचे हेरखाते सक्षम व कार्यक्षम असे होते।९ आजच्या काळात देखील अशा प्रकारचे कार्यक्षम हेरखाते आढळून येत नाही।

शिवाजी महाराजांनी किल्ल्यांची पुनर्रचना केल्यानंतर किल्ला व त्याच्या आसपासच्या प्रदेशाच्या संरक्षणाची जबाबदारीकरिता स्वतंत्र पथक ठेवलेले असे। किल्ल्याच्या पायथ्याला जी पहाऱ्याची ठिकाणे असत, त्यांना 'मेटे' म्हणत असत। सामान्यपणे 'मेटेकरी' हे कोळी, महार, ठाकर इत्यादी समुदायातील जातीतुन निवडले जात असत। मेटेकऱ्याचा किल्ल्याच्या भोवती अहोरात्र जागता पहारा असे। नागरिकांच्या संरक्षणाची जबाबदारी रामोशी, बेरड इत्यादी जातीतील व्यक्तींवर सोपविण्यात आलेली असे। चोरीचा तपास करणाऱ्या व्यक्तीला 'मेटकरी' असे म्हणत असत। असे सर्व मिळून पोलीस व्यवस्थेची वेगवेगळी कामे करीत असत। १०

## संदर्भग्रंथ:-


१) https:marathivishwakosh.maharashtra.gov.in/khandas/khand10

२) V.T. Gune, Judisial System of Maratha, Deccan College Post Graduate Research Institute, Poona, 1953, P.120.

३) Ibid, P.120.

४) M. Elphinstone, Report on the Territories Conquered from the Peshwa, 1821, P.33.

५) Gune, Op.Cit., P. 120.

६) Ibid.

७) T.T. Mahajan, Maratha Administration in the 18th Century, P.14.

८) विजय आपटे, शोध महाराष्ट्राचा, राजहंस प्रकाशन, पुणे, २०१६, पृ।५०।

९) http://www.epicchannel.com

१०) Gune, Op.Cit., P.120.